तरुण भारत संवाद

बुधवार २४ मे २०१७

# आयडीएची दंत आरोग्य शिबिरे

**मुंबई :** इंडियन डेंटल असोसिएशनने तंबाखु सेवनाचे दुष्परिणाम दाखविणारी महत्वाची मोहिम हाती घेतली असून देशातील इतरही मदरशांच्या विद्यार्थ्यांपर्यंत ही मोहिम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. आयडीएच्या देशभरात ४५० स्थानिक शाखा असून मालाड येथील मालवणीमधील मदरसा जामिया अर्बिया मिन्हाजुल सुन्नाह येथे नुकतेच पहिले तंबाखु आणि अंमली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामांवर जागरुकता निर्माण केली. मदरसांमध्ये अशा प्रकारची मौखिक जागरुकता शिबिरे घेणे अत्यंत महत्वाचे असल्याचे आयडीएचे सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे यांनी सांगितले. बरेचसे मदरसे हे दाट वस्त्यामध्ये वसले असून ते अमली पदार्थविक्री करणारे त्यांना लक्ष करतात. त्यामुळे आरोग्य जागृती शिबिरे घेणे अत्यंत महत्वाचे झाले असल्याचे ढोबळे म्हणाले. तंबाखुरहित आरोग्याचा मंत्र देत असताना ढोबळे यांनी मुलांना अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणामही सांगितले. अमली पदार्थ हळू हळू मारतात. ते आधी संवेदना मारतात आणि मग शक्तीच काढून घेतात. त्यामुळे कुटुंब आणि समाजासाठी रुग्ण होऊन जातो. या विळख्यात अडकला असाल तर ही सवय सोडून द्या, असे आवाहन ढोबळे यांनी केले. यावेळी अरेबिक शिक्षक मौलाना अब्दुल कादिर यांनी पानही सोडण्याचा विचार केला असल्याचे सांगितले. तर एजाज अली या १४ वर्षाच्या विद्यार्थ्याने मदरशामधील अभ्यासक्रमामध्ये मौखिक आरोग्य शिकविले जात नसल्याचे सांगितले. आम्ही सकाळपासून अगदी मध्यरात्रीपर्यंत अभ्यासात गढून जातो. मात्र या सोबत मौखिक आरोग्य सांभाळण्याचा सल्ला सोयीचा ठरेल, असेही तो पुढे म्हणाला.